# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गतइमारत, पहिला मजला, शासकीयतंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोननं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
Email -jtdirrom@gmail.com Website – www.jdteromumbai.com

**अतितात्काळ**
कालमर्यादा दि. २१/०२/२०१४ पर्यंत

**क्र.४/विकामुं/तांशा/ईबीसी/२०१४/** 534
दिनांक : 13 FEB 2014

प्रति,
**संचालक/प्राचार्य**
सर्व खाजगी विनाअनुदानीत/कायम विनाअनुदानीत
पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी संस्था

विषय : खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत संस्थांमधील आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यांत येत असलेल्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी ऑनलाईन प्रणालीबाबत..................................

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १५/अर्थसं/ईबीसी/ऑनलाईन/२०१३-१४/३२, दि. ११/०२/२०१४

उपरोक्त संदर्भांकीत विषयानुसार सर्व खाजगी विनाअनुदानीत/कायम विनाअनुदानीत पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी संस्थांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये काही ईबीसी लाभार्थी विद्यार्थ्यांचे अर्ज तांत्रिक अडचणीमुळे अथवा अन्य कारणांमुळे ऑनलाईन प्रणालीवर भरले नाहीत. अशा लाभार्थी विद्यार्थ्यांचे विलंबाचे ठोस कारण नमूद करुन संस्थेकडे प्राप्त असलेले अर्ज या कार्यालयाकडे दि. २१/०२/२०१४ पर्यंत विनाविलंब सादर करण्यांत यावेत. असे प्राप्त झालेले अर्ज सबळ व ठोस कारण विचारात घेऊन या कार्यालयात ऑनलाईन प्रक्रियेद्वारे भरण्यात येणार आहेत. सदरचे अर्ज ऑनलाईन भरण्याकरिता आपल्या संस्थेतील संबंधीत लिपिकास या कामासाठी नियुक्त करावे.

तसेच या आधी सादर केलेल्या अर्जांच्या छाननीची प्रक्रिया चालू असून छाननी पश्चात ज्या विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रुटी आढळून आलेल्या आहेत. अशा त्रुटी संस्थांनी सादर केलेल्या यादीमध्ये नमूद करुन सदर यादी स्कॅन करुन संस्थांना ईबीसी ऑनलाईन प्रणालीच्या मेसेज बॉक्सद्वारे पाठविण्यात येत आहेत. तरी सर्व संस्थांच्या संबंधीतांस सूचित करण्यांत येते की, त्यांनी ईबीसी ऑनलाईन प्रणालीचा मेसेज बॉक्स वेळोवेळी पहावा व नमूद केलेल्या त्रुटींची पूर्तता तात्काळ करावी.

**(जी.बी. धनोकार)**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७
तार EDUTECE-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in

क्र. १५/अर्थसं/ईबीसी/ऑनलाईन/२०१३-१४/32
दिनांक: 11 FEB 2014

प्रति,
सहसंचालक,
मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर

विषय :- **खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत संस्थांमधील आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येत असलेल्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी ऑनलाईन प्रणाली बाबत.**

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत संस्थांमधील आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येत असलेल्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के फी प्रतिपूर्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी ऑनलाईन प्रणाली चालू आर्थिक वर्ष २०१३-१४ पासून राबविण्यात आलेली आहे. सदर योजनेच्या लाभार्थी विद्यार्थ्यांचे अर्ज ऑन लाईन पध्दतीने भरण्यासाठी दिनांक २९.११.२०१३ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली होती, तथापी कांही लाभार्थी विद्यार्थ्यांचे अर्ज **तांत्रिक अडचणीमुळे अथवा अन्य कारणांमुळे ऑनलाईन प्रणालीवर भरले नाहीत. अशा लाभार्थी विद्यार्थ्यांचे विलंबाचे ठोस कारण नमुद करुन संस्थेकडे प्राप्त असलेले अर्ज विभागीय कार्यालयांकडे जमा करण्याबाबत आपल्या अधिनस्त संबंधित संस्थांना सुचना आपल्या स्तरावर देण्यात याव्यात** व सदरचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ऑनलाईन प्रणालीवर आपल्या कार्यालयास्तरावर माहीती भरावी व तात्काळ छाणनी करावी.

तसेच असेही आढळुन आले आहे की, ऑनलाईन प्रणालीवर भरलेल्या अर्जाची आपल्या विभागीय कार्यालयांकडून संपूर्णतः छाणनी करण्यात आलेली नाही. तरी प्रणालीवर प्राप्त झालेल्या सर्व अर्जांच्या छाणनीची **दिनांक २४.०२.२०१४** पर्यंत कार्यवाही पूर्ण करावी. **या तारखेनंतर कोणत्याही कारणामुळे प्राप्त होणा-या अर्जांचा विचार करण्यात येणार नाहीत, याबाबत सूचना सुध्दा आपल्या स्तरावरुन संबंधित संस्थांना देण्यात याव्यात.**

ऑनलाईन प्रणालीवर आपल्या विभागातील संबंधित संस्थेतील लाभार्थी विद्यार्थ्यांचा अर्जाची उपरोक्त विहित मुदतीत १०० टक्के छाणनी करणे अनिवार्य आहे. त्या करीता आपल्या स्तरावर अर्जांच्या छाणनी करीता आवश्यकते प्रमाणे पथक तयार करुन सदरहू कार्यवाही करण्यात यावी.

तसेच या संचालनालयाने उपलब्ध करुन दिलेल्या विवरणपत्रात आकडेवारी नमूद करुन माहिती **दिनांक २८.०२.२०१४** पर्यंत प्रत्यक्ष कामकाज हाताळणारे अधिकारी/कर्मचारी मार्फत या संचालनालयास सादर करावी.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक,
तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई

प्रत
श्रीमती व्ही. ए. चाटे, प्रणाली विश्लेषक तथा समन्वयक यांना कळविण्यात येते की, सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांना सदरहू ऑनलाईन प्रणाली संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात यावी.

\\192.168.1.9\Desk15\Kadam EBC 2012-13\ebc letter ro 2013-14.doc